झोपडपट्टी पुर्नर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्स:९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनी: ०२२-२६५९०५१९/०४०५/१८७९/०९९३
Email: info@sra.gov.in

क्र.झोपुप्रा/मुकाअ/परिशिष्ट-२/२००४/७०७
दिनांक : 9 SEP 2004

परिपत्रक - ६७

विषय : परिशिष्ट-२ चा प्रस्ताव विहीत नमून्यात पाठविणे बाबत.

शासन गृहनिर्माण विभाग मंत्रालय मुंबई यांचे कडिल अधिसुचना क्रमांक-सुविधा-१०२०/प्र.क्र.३७७/झोपसू-१ दिनांक २७.१०.२००१ अन्वये, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, बृहनमुंबई महानगर पालीका व त्यांचे नियंत्रणा खालील सहाय्यक आयुक्त महापालिका विभाग, अपर जिल्हाधिकारी, (अति/निष्क) मुंबई शहर, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई पश्चिम उपनगरे व अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई पूर्व उपनगरे व त्यांचे अधिपत्याखालील उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) यांना, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिकनयम ११७१ चे कलम ३ उपकलम-१ मधील तरतूदी नुसार सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत करणेत आलेले आहे.

वरिल अधिसुचने नुसार सक्षम प्राधिकरी त्यांचे मालकिच्या मिळकती वरिल गलीच्छ वस्तीचे पुनर्वसन करणेसाठी परिशिष्ट-२ तयार करून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सादर करतात. तथापी सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या बऱ्याच परिशिष्ट-२ सोबतच्या जोडपत्र-२ चे अवलोकन केले असता प्राधिकरणाने विहित केलेल्या नमुन्यात आढळून आलेले नाही. तसेच सर्व सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या जोडपत्र-२ मध्ये एकसूत्रता आढळून येत नाही. योजनेचे परिशिष्ट-२ संबधीत झोपडी धारकांना बघता यावे व त्यातील त्यांचे अस्तीत्व काय आहे याची माहीती प्राप्त होणेसाठी प्राधिकरणाने धोरणात्मक निर्णय घेऊन सदर परिशिष्ट-२ स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी निर्णय घेणेत आला आहे. प्राधिकरणाचे अंतर्गत सर्व अभिलेख संगणीकृत करण्याचे चालू असल्याने परिशिष्ट दोन प्राधिकरणाच्या वेबसाईटवर सुध्दा प्रसिध्द करण्याचा निर्णय घेणेत आला आहे. त्यामुळे परिशिष्ट-२ संगणकास पुरवतांना एकाच नमून्यात असणे आवश्यक आहे. सबब आपणास याव्दारे कळविणेत येते कि, सोबत जोडलेल्या परिशिष्ट-२ च्या जोडपत्रातील नमुन्यामध्ये मराठी व इंग्रजी मध्ये परिशिष्ट-२ च्या दोन प्रती झोपडीस्थित नकाशासह सिलबंद करून पाठविण्यात याव्यात. तसेच त्याची संगणिकृत सिडी पाठविण्यात यावी.

वर नमुद केलेल्या सुचना नुसार योजनेचे परिशिष्ट-२ प्राप्त न झाल्यास ते स्विकृत करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

वि.सु. : सहाय्यक आयुक्त महापालीका यांचे कडून प्राप्त होणाऱ्या परिशिष्ट-२ चे अवलोकन करता ते अ, ब, क, ड मध्ये अशी विभागणी करून पाठविण्यात येते उदा. सम्मती दिलेले, सम्मती न दिलेले, पुरावे सादर न केलेले, अशा प्रकारे देण्यात येते. सबब अशा सर्व झोपडीधारकांचे एकच परिशिष्ट-२ तयार करून पाठविणेत यावे व शेरा सदरात त्यानुसार नोंद घेणेत यावी जेणे करून योजने मधील एकूण झोपडी धारकांची एकत्रीत संख्या प्राप्त होईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रती :

१) सर्व महापालीका सहाय्यक आयुक्त विभाग.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधिपत्याखालील सक्षम प्राधिकारी.
३) अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई शहर, मुंबई पश्चिम उपनगरे व मुंबई पूर्व उपनगरे.
४) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) कुलाबा विभाग, मुंबई शहर
५) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई शहारातील धारावी विभाग
६) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) बांद्रा
७) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) अंधेरी
८) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड
९) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) बोरीवली
१०) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुलूंड
११) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) भांडूप
१२) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) घाटकोपर
१३) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) कुर्ला
१४) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) चेंबूर